# गांजा विक्री करणारे दोघे 'स्थागुशा'च्या ताब्यात

देशोन्नती दि 20/05/2023

## २ किलो ग्रॅम गांजासह बुलेट जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ चोरट्या मार्गाने विक्री करण्यासाठी बुलेटवर गांजा घेऊन जाणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ८ मे रोजी रात्री ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ४७ हजार ७२० रुपये किंमतीचा २ किलो गांजा व बुलेट असा एकुण १ लाख ४७ हजार ७२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला .

नांदेड शहरात व जिल्हयात अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थागुशाचे पोनि व्दारकादास चिखलीकर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार त्यांनी अंमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणाऱ्यांची माहिती काढून आरोपीस अटक करण्यासाठी पथके तयार करुन सूचना दिल्या होत्या.दरम्यान ८ मे रोजी गाडेगाव रोड पाण्याची टाकी जवळ दोन इसम त्यांचे ताब्यातील बुलेटवर ॲक्टच्या तरतुदीचा भंग करुन अंमली पदार्थ गांजाच्या लहान लहान पुड्या करुन लोकांना विक्री करीत असल्याची माहिती मिळाली.या माहितीवरून गाडेगाव रोड पाण्याचे टाकीजवळ फेरोज खान मेहबुबखान ऊर्फ बेग (३१) रा. टायरबोर्ड नांदेड व प्रमोद दिलीप सोनकांबळे (२७) रा. लिंबोनीनगर नांदेड हे एका बुलेटवर पांढऱ्या पोत्यात गांज्याचे पॉकीट भरुन विक्री करीत असताना मिळून आले. त्यांच्याकडून पथकाने अंमली पदार्थ गांजाची लहान- लहान प्लास्टीक कॅरीबॅगचे २३१ पॉकिट अंमली पदार्थ गांजाचे एकुण पांढऱ्या पोत्यासह वजन२.४९६ किलो ग्रॅम व निवळ लहान लहान प्लास्टीक कॅरीबॅग पॉकिट एकुण वजत २.३८६ वजनाचा असा एकूण ४७ हजार ७२० व १ लाख रुपये किमतीची एक काळया रंगाची बुलेट नंबर एम.एच. २६- सी.बी. - ८७१३ असा एकूण १ लाख ४७ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीची गांजाबाबत चौकशी केली असता त्यानी सदरचे गांजाचे पॉकीट जोहराबी ऊर्फ बब्बा खाला भ्र. अन्नवर खान पठाण रा. टायरबोर्ड नांदेड हिने तयार करुन विक्री करण्यासाठी दिल्याचे सांगितले. याप्रकरणी तीन्हीही आरोपींविरुध्द नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाई पथकात स्थागुशाचे पोनि व्दारकादास चिखलीकर, सपोनि पांडूरंग माने, पोउपनि दत्तात्रय काळे, पोहेकॉ गंगाधर कदम, अफजल पठाण, विलास कदम, मोतीराम पवार, रणधीर राजबन्सी, शंकर केंद्रे व हनुमानसिंह ठाकूर, बिचकुले अंगुली मुद्रा यांचा समावेश होता.